**पी.सी.आय. (पेव्हमेंट कंडीशन इंडेक्स) काढण्याची पद्धत –**

रस्त्यावरुन जीप वा कार चालवून त्याचे वाहतुकीचे वेगानुसार रस्त्याचा पी.सी.आय. ठरविण्याबाबत शासन निर्देश आहे. अस्तीत्वात असलेल्या रस्त्यावरुन जीप/कार या दर्जाचे वाहन कोणत्या वेगाने चालते/धावते यावरुन त्या रस्त्याचा पी.सी.आय. ठरविण्यात आलेला आहे. त्याबाबत निकष व गुणांकन पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | जीप/कार याचा वेग किमी प्रति ताशी | पी.सी.आय | रस्त्याची स्थिती (सरफेस कंडीशन) |
|---|---|---|---|
| 1. | 40किमी पेक्षा जास्त | 5 | अतिशय चांगला |
| 2. | 30 ते 40किमी दरम्यान | 4 | चांगला |
| 3. | 20 ते 30किमी दरम्यान | 3 | साधारण |
| 4. | 10 ते 20किमी दरम्यान | 2 | वाईट / खराब |
| 5. | 10किमीचे आंत | 1 | अतीशय वाईट/खराब |

कार्यकारी अभियंता
जि.प. बांधकाम विभाग क्र.१
यवतमाळ

जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून करावयाच्या रस्ते बांधणीबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

### शासन निर्णय क्रमांकः जिवायो- २०१५/प्र.क्र.१९१/पंरा-८

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४००.००१
तारीख: ०३ सप्टेंबर, २०१६

वाचा :- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का-१४८१, दिनांक १७ डिसेंबर, २०१४.
३) शासन परिपत्रक क्र. ग्रासयो-२०१५/प्र.क्र.८/पं.रा.-७, दि.११ डिसेंबर, २०१५

**प्रस्तावना -**

सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखडयानुसार महाराष्ट्र राज्यात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांची एकूण प्रस्तावित लांबी साधारणत: २,३६,००० कि.मी. इतकी आहे. एवढया प्रचंड लांबीपैकी काही लांबी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत अंतर्भूत आहे. तर उर्वरित लांबी जिल्हा परिषदेकडे आहे. प्रत्यक्षात रस्त्यांची मोठया प्रमाणातील लांबी व जिल्हा नियोजन समिती, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभागाकडील रस्ते दुरुस्तीसाठी उपलब्ध होणारा मर्यादित निधी यामुळे रस्ते या क्षेत्रासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीचा सुयोग्य वापर व्हावा, कामांमध्ये सुसूत्रता राहावी त्याचप्रमाणे कामांत व्दिरूक्ती (duplication) होऊ नये या दृष्टिने सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून राज्य स्तरीय योजना व जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत रस्ते क्षेत्रासाठी जो निधी उपलब्ध करून दिला जातो त्या अंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या क्षेत्राचा विकास समन्यायी पध्दतीने होण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण " ३०५४-मार्ग व पूल, ०४ - जिल्हा व इतर मार्ग, ८०० - इतर खर्च, ग्रामीण रस्त्यांचा विकास व

मजबूतीकरण, ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" आणि इतर जिल्हा रस्ते विकास व मजबूतीकरण " ५०५४- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च, ०४, जिल्हा व इतर मार्ग, ८००-इतर खर्च, इतर जिल्हा रस्त्यांचा विकास व मजबूतीकरण, ५३-मोठी बांधकामे" या जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांकरिता या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत:-

(१) इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची कामे जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करताना रस्ते विकास योजना आराखडा २००१-२०२१ मधील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात यावीत. अशी कामे खालील नमूद प्राधान्यक्रमाने प्रस्तावित करावीत :-

१.१) पुलांच्या नियमित सर्वेक्षणामध्ये जे पूल / मोऱ्या कमकुवत व असुरक्षित झाले असून त्यांची पुनर्बांधणी आवश्यक आहे असे पूल व मो-या. (दुरुस्ती नाही.) ज्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गावरील वाहतूक पुरामुळे खंडीत होण्याचे प्रमाण हे विहित केलेल्या निकषांपेक्षा जास्त आहे, अशा रस्त्यांवरील पुलांची कामे. ( सर्व रस्ते बारमाही वाहतुकीचे असावेत.)

१.२) ज्या मार्गावर जास्त वाहतूक वाढलेली आहे त्याची विहित निकषानुसार पडताळणी करून अशा रस्त्यांची कामे, पूल / मोऱ्या आणि सुटलेली लांबी (Missing Link),

१.३) त्यानंतर अत्यंत खराब झालेल्या लांबीतील रस्ते सुधारणेची कामे,

१.४) <u>कोकण विभागामधील</u> कमकुवत व अरुंद साकव पुलांचे (पादचारी मार्ग) पुनर्बांधकाम करण्याचा सुध्दा त्यात समावेश असावा. शक्य असल्यास साकवाऐवजी एकपदरी (४.२५ मी. रुंद) पुलाचा समावेश करावा.

(२) जिल्हा परिषदेस दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी २० टक्के निधी नवीन जोडणी अस्तित्वात नसलेली लांबी (Missing link जोडणे) व ६५ टक्के निधी रस्ते मजबूतीकरण व दर्जोन्नतीसाठी करण्याकरीता राहील. उर्वरित १५ टक्के पूल व मोऱ्यांच्या कामाकरिता वापरता येईल. ज्या जिल्हा परिषदेकडे नवीन जोडणीचा पूल व मोऱ्यांचा प्रस्ताव नसेल त्या जिल्हा परिषदेस १०० टक्के निधी रस्ते मजबूतीकरण व दर्जोन्नती करण्याकरीता वापरण्याची मुभा राहील.

(३) प्रस्ताव सादर करताना विचारात घ्यावयाच्या <u>**सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना**</u> खालीलप्रमाणे आहेत:-

३.१) राज्यामध्ये ग्रामीण रस्त्यांची एकूण लांबी साधारणत: २,३६,००० कि.मी. आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये एक गाव एक रस्ता या धोरणानुसार कोअर नेटवर्क तयार करण्यात आलेले आहे. या कोअर नेटवर्कमधील रस्त्यांची निवड करताना शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रासयो-२०१५/प्र.क्र.८/पंरा-७, दि. ११ डिसेंबर, २०१५ चा अवलंब करण्यात येत आहे. यामध्ये कोअर नेटवर्कमधील सर्व रस्त्यांची तालुकानिहाय प्राधान्यक्रम यादी तयार करण्यात आलेली आहे. प्रत्येक रस्त्याला गुण देण्यात आलेले आहेत.

या कोअर नेटवर्क व्यतिरिक्त उर्वरित रस्त्यांचे सर्वेक्षण व प्राधान्यक्रम यादी उपरोक्त दिनांक ११ डिसेंबर, २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने तयार करावेत. असे करताना इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्ते यांच्याकरिता तालुका स्तरावर PCI आधारे वेगवेगळ्या प्राधान्यक्रम याद्या तयार करण्यात याव्यात व जिल्हा नियोजन समितीमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांच्याकरिता त्या जिल्ह्यास देण्यात येणाऱ्या नियतव्ययाच्या उपलब्धतेनुसार तालुकानिहाय जो निधी उपलब्ध असेल त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांचेकडील तालुकानिहाय प्राधान्यक्रम यादी व जिल्हा परिषद, बांधकाम विभागाकडील यादी यांचे एकत्रीकरण करण्यात येऊन मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर/प्रस्तावित रस्ते वगळून उर्वरित रस्त्यांपैकी प्राधान्यक्रम यादीनुसार/गुणांकनानुसार पात्र रस्ते निवडण्यात यावेत व तालुकानिहाय इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा.

जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नियतव्यय व दायित्व यांचा मेळ घालण्यात यावा. दायित्वाच्या कामांना प्रथमत: पूर्ण निधी देऊन उरलेल्या शिल्लक निधीतून नवीन कामांसाठी दिडपटीत नियोजन करावे. तदनंतर हा निधी तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रानुसार वाटप करण्यात यावा. तालुकानिहाय उपलब्ध निधी व प्राधान्यक्रम यादी यांच्या आधारेच रस्त्यांची निवड करण्यात यावी. रस्त्यांचे फक्त खडीकरण घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच पुलांची कामे जोडरस्त्यासह घेणे बंधनकारक राहील.

रस्त्यांचे प्रस्ताव करताना किमान एक किलोमीटर लांबी घेण्यात यावी. PCI रजिस्टर, प्राधान्यक्रम यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने

अंतिम करावी. PCI (Pavement Condition Index) सर्व्हेक्षण दर दोन वर्षांनी करण्यात यावे.

PCI सर्व्हेक्षणासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे ऑपरेशन मॅन्युअलमधील मार्गदर्शक सूचनांचा वापर करण्यात यावा.

प्राधान्यक्रम यादी दरवर्षी सुधारित करण्यात यावी. एखादा रस्ता ज्यावर्षी मंजूर होईल त्यानंतर पुढील चार वर्षे त्या रस्त्यांच्या लांबीचा समावेश प्रस्तावात करण्यात येऊ नये.

जिल्हा नियोजन समितीस अंतिम प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी उपरोक्त पध्दत अवलंबिल्याची खात्री झाल्यानंतर सादर करावा.

३.२) शासनस्तरावरून वेळोवेळी ई-मेलद्वारे / टपालाद्वारे पाठविण्यात आलेल्या पत्रातील कामे वरील (३.१) मध्ये नमुद निकष विचारात घेऊन प्रस्तावित करण्याबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

३.३) कामे प्रस्तावित करताना उपलब्ध नियतव्यय, सद्य:स्थितीत हाती घेण्यात आलेल्या कामांची उर्वरित किंमत व नवीन कामांचा उपलब्ध वाव विचारात घेऊन किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होणार नाही, याची दक्षता घेऊन अत्यंत महत्वाची कामे तालुकानिहाय प्राथम्यक्रमानुसार प्रस्तावित करावीत.

३.४) कामांचे प्रस्ताव सादर करताना ते जास्तीत जास्त परिपूर्ण असावेत. विशेषत: पुलांची कामे मंजूर करुन घेण्यात येतात, परंतु त्या मंजूर पुलांचे जोडरस्ते तयार नसतात अथवा पुलांच्या कामांमध्ये त्यांचा समावेश नसतो, मंजूर पुलांचे बांधकाम पूर्ण होते, परंतु जोडरस्त्या अभावी तयार झालेला पूल विनावापर पडून राहतो. त्यामुळे शासनाचा भांडवली खर्च निष्फळ ठरतो, तसेच मोठ्या प्रमाणावर पुलांची कामे मंजूर होतात. तथापि, कामे मंजूर झाल्यानंतर त्या कामांचे संकल्पचित्र तयार करण्यास वेळ जातो व मंजुरीनंतर संकल्पचित्रास मान्यता मिळविण्यात येते व त्यानंतर कामाच्या निविदा काढणे, कार्यारंभ आदेश देणे या बाबी केल्या जातात. त्यामुळे प्रत्यक्ष कामास सुरुवात होण्यास विलंब होतो आणि कामाची अंदाजित किंमत वाढत जाते. त्यामुळे कामे प्रस्तावित करताना प्रत्यक्ष जागेची पाहणी व उपलब्धता तपासून प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

३.५) अनेक कामांच्या बाबतीत देण्यात येणारा साखळी क्रमांक व प्रत्यक्षात ज्या ठिकाणी काम करावयाचे आहे तेथील साखळी क्रमांक यामध्ये बदल असतो. त्यामुळे प्रस्तावानुसार

मंजुर केलेला साखळी क्रमांक नंतर बदलून घेण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त होतात. तरी अशा स्वरुपाच्या तांत्रिक चुका होऊ नयेत याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून दक्षता घेण्यात यावी.

३.६) प्रस्तावात जास्तीत जास्त कामांचा समावेश व्हावा, या हेतूने जाणीवपूर्वक कामांच्या किंमती कमी दर्शवून नंतर सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर केले जातात. सदरची प्रवृत्ती टाळण्यासाठी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांनी सर्व कामे स्वत: तपासून कामांच्या किंमती वस्तुनिष्ठरित्या सादर कराव्यात.

३.७) कोणत्याही परिस्थितीत रस्ते विकास योजना सन २००१-२१ मध्ये समाविष्ट नसलेल्या रस्ते व पुलांची कामे घेण्यात येऊ नयेत. एकच काम जिल्हा नियोजन समिती, विशेष दुरुस्ती, आदिवासी उपयोजना, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, इ. योजनांमधून प्रस्तावित होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच एकाच रस्त्यावर दोन किंवा अधिक कामे प्रस्तावित करु नयेत.

३.८) मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या काम करण्याच्या क्षमता किंवा निविदा प्रक्रियेचे टप्पे नजरेसमोर ठेवून कामांचे तुकडे पाडू नयेत.

३.९) प्रस्तावित काम वन खात्याच्या जागेत / धरणाच्या बुडीत क्षेत्रात नसल्याची व भुसंपादनाची आवश्यकता नसल्याची प्रथमत: खात्री करावी.

३.१०) नवीन कामे प्रस्तावित करताना कामांच्या अंदाजित किंमतीमध्ये प्रस्तावित असलेल्या प्रयोजनाचा ( Details of Proposed Provisions ) व त्यासाठी प्रति कि.मी. गृहित धरण्यात आलेल्या रक्कमेचा (Cost per Km Presumed) तपशील न चुकता प्रस्ताव विहित विवरणपत्रामध्ये देण्यात यावा.

३.११) उपरोक्त सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषदेने गतवर्षीच्या प्राप्त निधीच्या मर्यादेत प्रस्ताव तयार करावेत.

(४) <u>उपलब्ध होणारा संभाव्य निधी व कार्यक्रमाची एकूण किंमत :-</u>

४.१) योजना प्रधान लेखाशिर्षावर दाखविण्यात याव्यात.

४.२) चालू योजनांच्या उर्वरीत खर्चावर प्राथम्याने विचार करण्यात यावा.

४.३) आराखड्यात कामे प्रस्तावित करतांना अपुर्ण कामांना लागणाऱ्या निधीची पुर्ण तरतूद केल्यानंतरच नवीन बाबी / कामे प्रस्तावित करावीत.

४.४ ) जिल्हा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या नियतव्यय मर्यादेतून अपूर्ण कामांना लागणारा निधी वजा करुन उर्वरीत रकमेच्या दीड पट रकमेच्या मर्यादेतीलच नवीन कामे प्रस्तावित करता येतील.

(५) <u>रस्त्याची नवीन बांधकामे व सुधारणा</u> करतेवेळी इंडियन रोड काँग्रेस ने प्रसिध्द केलेल्या मानकातील प्रमाणके व विनिर्देश रस्त्याच्या दर्जानुसार वापरण्यात यावेत. यासाठी इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गासाठी आयआरसी-एसपी-२० मधील निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच रस्त्याचे बांधकाम हे ग्रामीण रस्ते बांधकामासाठी इंडियन रोड काँग्रेस ने प्रसिध्द केलेल्या IRC- SP-७२-२०१५ या पुस्तिकेमधील तांत्रिक तरतुदीनुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित मानकांप्रमाणे करण्यात यावे.

(६) <u>पुलाचे संकल्पन व बांधकाम करताना</u> :-

६.१) १५ मी. लांबीपर्यंतचे पुलाचे संकल्पचित्र व गाळेरचना, इ. कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्या स्तरावर निश्चित करावे.

६.२) १५ मी. ते ५० मी. लांबीपर्यंतच्या पुलाचे संकल्पचित्र व गाळेरचना प्रादेशिक स्तरावरील अधीक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांच्याकडून मंजूर करुन घ्यावे.

६.३) ५० मी. पेक्षा जास्त लांबीच्या पुलांचे संकल्पचित्र व गाळेरचना अधीक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम), संकल्पचित्र मंडळ, मुंबई/नागपूर यांच्याकडून मंजूर करुन घ्यावे. त्याकरिता सार्वजनिक बांधकाम म्यॅन्युअलनुसार आवश्यक शुल्क भरावे व तशी तरतुद पुलाच्या प्राकलनामध्ये करावी.

६.४) पुलांची बांधकामे ग्रामीण रस्त्यांवर करावयाची असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित केलेल्या निकषानुसार शक्यतो मध्यम उंचीचे बुडीत पुलांची (Submersible Bridges) बांधकामे प्रस्तावित करावीत.

७. प्रस्तावित करावयाच्या रस्ते व पुल बांधकामांचा प्रस्ताव सादर करण्यापुर्वी सदर कामांना सक्षम स्तरावर <u>प्रशासकीय मान्यता</u> प्रदान केलेली असावी. प्रस्तावासोबत प्रशासकीय मान्यतेच्या प्रती सादर करण्यात याव्यात. कामांना मंजुरी मिळाल्यानंतर सक्षम स्तरावर <u>तांत्रिक मान्यता</u> घेण्याची कार्यवाही संबंधित कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद यांनी त्वरीत करावी.

(८) या कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अ) (१) जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) यांनी त्याची तपासणी व कार्यवाही सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नमुद तरतूदीप्रमाणे प्रचलित शासन निर्णय / परिपत्रक तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १६८, १६९, १७० प्रमाणे करणे आवश्यक राहील.

(२) ज्या कामाबाबत तक्रार येईल त्या कामाची संयुक्त तपासणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग), जिल्हा परिषद यांच्या समवेत करावी व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करावी.

(ब) सदर योजनेअंतर्गत होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावीत यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांच्या अधिपत्याखालील पॅनेलवरील राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM) यांच्याकडून संबंधित जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामांची तपासणी करुन घ्यावी. यासाठी जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांच्याकडून आवश्यकतेनुसार यादी घ्यावी. राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी. सदर अहवाल समाधानकारक नसेल तर अहवालातील त्रृटी संबंधित ठेकेदाराकडून दुर करुन घ्याव्यात. त्रुटी दूर होणार नसल्यास, जिल्हा परिषदेच्या संबंधित कार्यकारी अभियंता/उप अभियंता व कंत्राटदार यांच्याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर नियमानुसार उचित कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

गुणवत्ता तपासणीसाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या १% या दराने गुणवत्ता नियंत्रणासाठी राखीव ठेवावेत. ही रक्कम कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर यंत्रणेकडून काम सुरू असताना व काम पूर्ण झाल्यावर अशा दोन वेळेस कामाची तपासणी करण्यात यावी. गुणवत्ता निरीक्षकांसाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत विहित केलेल्या दरानेच मानधन संबंधित गुणवत्ता निरीक्षकास देण्यात यावे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही अचानकपणे दौऱ्याच्यावेळी काही कामांची तपासणी करावी.

या कामांची तपासणी करण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंतर्गत जिल्हा प्रयोगशाळा उपलब्ध आहे तेथे या कामाची तपासणी व साहित्यांच्या चाचण्या करण्यात याव्यात. या बाबतच्या सविस्तर सूचना शासन परिपत्रक क्र.ग्रासयो-२००८/प्रक्र.७५/ योजना-९, दिनांक २९ मे, २००८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

(९) रस्त्यांच्या कामाच्या बाबींमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विहित केल्यानुसार काम पूर्ण झाल्यानंतर दोष दायित्व कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती संबंधित ठेकेदाराकडून करुन घेण्याची तरतूद ठेवण्यात यावी.

(१०) रस्त्यांची कामे योग्य त्या दर्जाची राहतील हे पाहण्याचे काम कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कटाक्षाने करावे.

(११) वरील मार्गदर्शक सूचनांनुसार इतर जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्त्यांची निवड ही जिल्हा परिषदेने करावी व जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव पाठवावेत.

(१२) सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.डीएसजे/१०६२/१५, दि.२२ जुलै, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

(१३) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७२७१२३७३४६८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Nathlya Valvi

Digitally signed by Prakash Nathlya Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Nathlya Valvi
Date: 2016.09.03 15:41:38 +05'30'

प्रकाश वळवी
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२.मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३.मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व).

५. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व), विधानमंडळ,मुंबई.

६ .अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

७. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

८. विभागीय आयुक्त, सर्व महसुल विभाग.

९.सर्व जिल्हाधिकारी

१०.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर.

११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१३. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) (सर्व)

१४. सर्व मंत्रालयीन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

१५. उपआयुक्त (नियोजन), सर्व विभागीय आयुक्त कार्यालये.

१६. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती (सर्व जिल्हे)

१७. अवर सचिव/पं.रा.७, कार्यासन अधिकारी, (यो-८,यो-९)

१८. निवड नस्ती (कार्यासन पंरा-८)

जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून करावयाच्या रस्ते बांधणीबाबत मार्गदर्शक सूचना.
सुधारित आदेश

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांकः जिवायो- २०१५/प्र.क्र.१९१/पंरा-८**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,मुंबई - ४०० ००१,
तारीख: २९ ऑक्टोबर, २०१६.

वाचा -

१) शासन निर्णय नियोजन विभाग,क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/ का-१४४४,दि. १६ फेब्रुवारी, २००८.
२) शासन निर्णय नियोजन विभाग,क्र.डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का-१४८१, दि.१७ डिसेंबर, २०१४.
३) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. ग्रासयो-२०१५/प्र.क्र.८/पं.रा.-७ दि. ११ डिसेंबर, २०१५
४) शासन निर्णय ग्राम विकास विभाग, क्र. जिवायो-२०१५/प्र.क्र.१९१/पंरा-८. दि. ३ सप्टेंबर, २०१६

प्रस्तावना -

सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखडयानुसार महाराष्ट्र राज्यात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांच्या एकूण प्रस्तावित लांबीपैकी प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरीता रस्ते या क्षेत्रासाठी जिल्हा नियोजन समिती, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग यांच्याकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा सुयोग्य वापर व्हावा, कामांमध्ये सुसूत्रता राहावी, त्याचप्रमाणे कामात (duplication) होऊ नये या दृष्टिने सर्वसमावेशक सूचना संदर्भातील क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

तथापि, या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत तालुका स्तरावर PCI ( Pavement Condition Index ) आधारे वेगवेगळ्या प्राधान्यक्रम याद्या तयार करणे तसेच निधी उपलब्धतेनुसार कार्यकारी अभियंता (PMGSY) यांच्याकडील तालुकानिहाय प्राधान्यक्रम यादी व जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडील यादी यांचे एकत्रिकरण करुन मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजूर/प्रस्तावित रस्ते वगळून उर्वरित रस्त्यांपैकी प्राधान्यक्रम यादीनुसार पात्र रस्ते निवडणे व तालुकानिहाय इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांचा प्राधान्यक्रम निश्चित करणे यासाठी लागणारा कालावधी विचारात घेऊन सदरचा निधी व्यपगत होऊ नये म्हणून दि. ३ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना पुढील वित्तीय वर्ष म्हणजेच एप्रिल, २०१७ पासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय-**

उपरोक्त प्रस्तावनेतील कारणमिमांसा लक्षात घेऊन जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या "ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४) आणि इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण" (५०५४) या जिल्हास्तरीय योजनांसाठी शासन निर्णय दि.३ सप्टेंबर, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना पुढील वित्तीय वर्ष म्हणजेच एप्रिल, २०१७ पासून लागू राहतील

जिल्हा परिषदांनी दि. ३ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ या वित्तीय वर्षापासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांच्याकरीता तालुका स्तरावर PCI व इतर निकषानुसार प्राथम्यक्रम याद्या तयार करुन त्यास मान्यता घ्यावी. तसेच दर वर्षी पुढील वित्तीय वर्षामध्ये घ्यावयाच्या रस्त्यांची तालुका स्तरावर PCI व इतर निकषानुसार प्राथम्यक्रम याद्या डिसेंबर अखेर पर्यंत तयार करुन या यादीस मान्यता घ्यावी.

सन २०१६-१७ या चालू आर्थिक वर्षात पुर्वीप्रमाणे नियम / कार्यपध्दतीनुसार या जिल्हास्तरीय योजना राबविण्यात याव्यात. तसेच निविदा प्रक्रियेचे टप्पे नजरेसमोर ठेऊन कामाचे तुकडे पाडू नयेत.

वरील सुधारणा व्यतिरिक्त संदर्भिय शासन निर्णय दि. ३ सप्टेंबर, २०१६ मधील इतर सर्व तरतूदी व सूचना कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०२६१३२४११८३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Nathlya Valvi

Digitally signed by Prakash Nathlya Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=37e23389b57a9e7ec7b19b76a580789713f16034880d23f1579f9f010c94459d, cn=Prakash Nathlya Valvi
Date: 2016.10.29 17:50:52 +05'30'

**( प्रकाश वळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)

५. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व), विधानमंडळ,मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. सर्व विभागीय आयुक्त, सर्व महसुल विभाग
९. सर्व जिल्हाधिकारी
१०.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१३. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) (सर्व)
१४. सर्व मंत्रालयीन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१५. उपआयुक्त (नियोजन), सर्व विभागीय आयुक्त कार्यालये
१६. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती (सर्व जिल्हे)
१७. अवर सचिव/पं.रा.७, कार्यासन अधिकारी, (यो-८,यो-९)
१८. निवडनस्ती (कार्यासन पंरा-८)